मुंबई विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण विभाग

क.वि.क/१०/२०१३

डॉ. मृदुल निळे
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट
मुंबई ४०० ०२०.

परिपत्रक :
खालील नमूद नक्कल पत्र हे शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -४११ ००१ यांचे दिनांक २६ एप्रिल, २०१३ चे आहे.

---

प्रति,
मा. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

विषय : विविध कल्याणकारी योजनांच्या संदर्भात लाभार्थींच्या बॅंक खात्यात थेट रोख रक्कम हस्तांतरीत करणेबाबत.

संदर्भ : शासनाचे क. संकिर्ण-२०१२/प्रक-४४१/विशि-३) दिनांक १८ फेब्रुवारी, २०१३ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे आपणास पृष्ठांकित केलेले संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रानुसार विद्यापीठांकडून शासनाच्या विविध योजनांतर्गत विद्यार्थ्यांना जे आर्थिक लाभ देण्यात येतात, ते लाभ आधार (UID) कमांकाशी संलग्न बॅंक खात्यांमार्फत लाभार्थ्यांना थेट देणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यापीठांकडून विविध योजनांन्वये विद्यार्थ्यांना देण्यात येणारे सर्व लाभ आधार कमांकाशी संलग्न बॅंक खाती सुरू केलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे आधार कार्ड काढून घेण्याच्या सूचना देण्यात येऊन त्याच्या आधारे संलग्न बॅंक खाते सुरू करून अनिवार्य करण्यात यावे.

याबाबत आपल्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचलनालयास त्वरीत सादर करण्यात यावा.

सही/-
प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती शाखा
महाराष्ट्रराज्य, पुणे-१

---

कार्यवाही अहवाल संचालक विद्यार्थी कल्याण विभागास, ई मेल वर :deptstudentswelfare@gmail.com सादर करावा किंवा वरील पत्त्यावर पाठवावा.

(डॉ. मृदुल निळे)
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक : १० मे, २०१३.

प्रत रवाना : प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/ विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.